वाचले :

१)"ह" क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील आदेश क्र. हक्षेका/भूजि/५//कावि/३७/१८ दि. २८/०२/२०१८.

२)रियल लाईफ रियल पिपल यांचेकडील दि. १३/०८/२०१८ रोजीचे पत्र.

३)मा.अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. वायसीएमएच/६/कावि/३१५/१८ दि. २४/०८/२०१८

४)मा. आयुक्त यांचा दि१७/१२/२०१९ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र. भूजि/९/कावि/३६७/२०१९
दि . २३/१२/२०१९

**विषय : यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या गोर-गरीब, बेवारस रुग्णांची सेवाभावी कार्य करणेकामी "रियल लाईफ रियल पिपल" व "पिंपरी चिंचवड मनपा" यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविण्याबाबत...**

आदेश,

वाचले क्र. १ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे १० बाय १० च्या जागेत रियल लाईफ रियल पिपल ही संस्था "ह" क्षेत्रिय कार्यालयाकडील आदेशान्वये ११ महिन्यांसाठी भाडे करार करुन रुग्णालयात दाखल झालेल्या गरीब, निराधार रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोफत भोजन, नाष्टा, कपडे, औषध आर्थिक मदत, बेवारस रुग्णांचे पुनर्वसन, बेवारस रुग्णांचा मृत्यु झाल्यास पोलिस व त्यांचे नातेवाईकांमार्फत अंत्यविधी इ. सेवाभावी कार्य मोफत करीत आहे. त्यांच्या कौतुकास्पद कार्यामुळे पिंपरी चिंचवड शहराचे नाव लौकीक होण्यास भर पडत आहे. त्यांच्या कार्याबददल सतत वर्तमान पत्रांमध्ये चांगल्या बातम्या येत आहे. ही संस्था सदरचे सेवाभावी कार्य सन २०१३ पासून करीत आहे. सदर कराराची मुदत ही दि. ३१/१/२०१९ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे दिनांक ०१/०२/२०१९ पासून दिनांक ३१/०१/२०२२ पर्यंत प्रायोगिक तत्वावर देण्याचे प्रस्तावित आहे.

वाचले क्र. २ अन्वये सदर संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व रियल लाईफ रियल पिपल यांच्या संयुक्त उपक्रमाव्दारे हा सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत कळविलेले आहे. यापुर्वी त्यांच्या संस्थेच्या कार्याची प्रचिती/स्वरुप मनपास माहिती नसल्यामुळे त्यांना क्षेत्रिय कार्यालयांतर्गत वेळोवेळी ११ महिने मुदत वाढ देऊन भाडे करार करणेत आलेला आहे.

वाचले क्र. ३ अन्वये अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांनी सदर संस्थेचे रुग्ण सेवेचे कामकाज पाहून हे सेवाभावी कार्य सदर संस्था व पिंपरी चिंचवड मनपाच्या संयुक्त उपक्रमाव्दारे राबविण्याबाबत स्पष्ट शिफारस केलेली आहे.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८ उपरोक्त वाचले क्र. १ ते ३ च्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या गोर-गरीब, बेवारस रुग्णांची सेवाभावी कार्य करणेकामी "रियल लाईफ रियल पिपल" व "पिंपरी चिंचवड मनपा" यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविण्याबाबत दिनांक ०१/०२/२०१९ पासून दिनांक ३१/०१/२०२२ पर्यंत मेमोरन्डम ऑफ अन्डरस्टँडिंगमधील अटी व शर्तीस अधिन राहून जागा वापरास मान्यता देत आहे.

(श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रत : १)क्षेत्रिय अधिकारी, ह क्षेत्रिय कार्यालय

२)वैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

३)वैद्यकीय अधिक्षक, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

४)संस्थापक/अध्यक्ष, रियल लाईफ रियल पिपल